महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक,
कार्यालय, यवतमाळ
एल. आय. सी. चौक,

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

E-mail ID - sp.yavatmal@mahapolice.gov.in

दुरध्वनी क्र. ०७२३२ - २५६७०१

जा.क्र. – पोअय///२०२५ दिनांक -

दि. १७/१०/२०२५

# प्रेसनोट

## यवतमाळ जिल्हा पोलीस दलातर्फे सायबर पोलीस स्टेशनतर्फे, वितरित करण्यात आले पंधरा लाख रुपये

**राष्ट्रीय सायबर गुन्हे रिपोरींग पोर्टल NCCRP** या पोर्टलचा उपयोग ज्या लोकांची ऑनलाईन आर्थीक फसवणूक झालेली आहे, अशा तक्रारींची या पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने त्वरित नोंद करण्यासाठी केला जातो. भारत सरकारचा हा फार महत्त्वाचा व स्तुत्य उपक्रम आहे, आज रोजी यवतमाळ जिल्ह्यातील फसवणूक झालेले तक्रारदार यांना यवतमाळ जिल्हा पोलीस दलातर्फे **NCCRP** पोर्टल द्वारे नोंद केलेल्या तक्रारीच्या माध्यमातून सायबर पोलीस स्टेशन यवतमाळ, यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.. कुमार चिंता साहेब तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक थोरात साहेब, यांचे मार्गदर्शनात पोलीस नीरीक्षक श्रीमती यशोदरा मुनेश्वर मँडम व त्यांची टिम यांनी 90,00000 रु. रक्कम होल्ड केली होती, आणि त्यातून पंधरा लाख रुपये आज रोजी परत करण्यात आली. **NCCRP** या पोर्टलचा उपयोग व वापर 2019 पासून केला जातो परंतु 2023 पासून प्रभावीपणे त्याचा वापर केला जात आहे. 2023 मध्ये एकूण 1055 तक्रारी प्राप्त झाल्या होत्या आणि 39 लाख रुपये होल्ड करण्यात आले होते 2024 मध्ये 1956 तक्रारी नोंद झाल्या आणि चार करोड रुपये होल्ड करण्यात आले, **सन 2025 मध्ये 1585 तक्रारी प्राप्त झाल्या असून 90 लाख रुपये होल्ड करण्यात आले त्यापैकी 42** तक्रारदार यांना **15 लाख रुपये आज रोजी यवतमाळ जिल्हा पोलीस दलातर्फे सायबर पोलीस स्टेशनतर्फे मा. श्री. रामानाथजी पोकळे साहेब, विशेष मोलीस महानिरिक्षक, अमरावती परिक्षेत्र यांचे हस्ते तक्रारदार यांना परत करण्यात आली. तसेच होल्ड केलेली रक्कम कोर्ट प्रक्रीया पुर्ण करुन लवकरात लवकर तक्रारदार सांचे स्वाधीन करण्यात येणार आहे.श्री. रामनाथजी पोकळे साहेब, विशेष मोलीस महानिरिक्षक, अमरावती परिक्षेत्र, यांनी जनतेस सायबर गुन्ह्यांपासुन व फसवणुकी पासुन सतर्क व सावधान राहण्याचे आवाहन केले आहे.**

सदर कार्यक्रमा करीता श्री. रामनाथजी पोकळे साहेब, विशेष मोलीस महानिरिक्षक, अमरावती परिक्षेत्र, यवतमाळ जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता साहेब तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक थोरात साहेब, सोबत ASP पुसद श्री. बी. जे. हर्षवर्धन सर, ASP पांढरकवडा श्री. बन्सल सर, उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा श्री. भोरे सर, उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ श्री. बैसाणे सर, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरखेड, श्री. गायकवाड सर, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी, मुख्यालय, श्री. हुड सर, सर्व शाखा प्रमुख अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच तक्रारदार सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन पोनि श्रीमती यशोदरा मुनेश्वर मँडम, सायबर पोलीस स्टेशन यांनी केले,

SRGulhane

शुभांगी रा. गुल्हाने
जनसंपर्क अधिकारी, (सपोनी.)

Scanned with OKEN Scanner